सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

(सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७)

# महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) अधिनियम, १९६२

(दिनांक १५ ऑक्टोबर, २०१२ पर्यंत सुधारित)

(Maharashtra Act No. XXVII of 1962)

# The Maharashtra Education and Employment Guarantee (Cess) Act, 1962

*(As modified upto the 15th October, 2012)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित
आणि संचालक, शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन, महाराष्ट्र राज्य,
मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

२०१३

[ किंमत रु. ७-०० ]

(सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७)

# महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) अधिनियम, १९६२

(दिनांक १५ ऑक्टोबर, २०१२ पर्यंत सुधारित)

(Maharashtra Act No. XXVII of 1962)

# The Maharashtra Education and Employment Guarantee (Cess) Act, 1962

*(As modified upto the 15th October, 2012)*

एच–२०१२–१.

(सन १९६२ चा महा. २७)

# महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) अधिनियम, १९६२


उद्देशिका.

कलमे.

## प्रकरण १

### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव व व्याप्ति.

२. व्याख्या.

## प्रकरण २

### शिक्षण उपकर

३. शिक्षण उपकर.

४. शिक्षण उपकर बसविणे व गोळा करणे.

५. विवक्षित बाबतीत शिक्षण उपकरांची आकारणी ठरविण्याची रीत.

६. निरसित.

## प्रकरण ३

### जमिनी व इमारती यांवरील कर वसूल करण्यासंबंधी तरतुदी

७. विवक्षित जमिनी व इमारती यांच्याबाबतीत कर भरण्यापासून सूट.

८. जमिनी व इमारती यांवरील कर भरण्याची प्राथमिक जबाबदारी.

९. कर वगैरे गोळा करण्यास सक्षम असलेले प्राधिकारी.

१०. कर देण्यात कसूर केल्यास शास्ती.

११. कर ज्या जमिनींवर व इमारतींवर आकारला जात असेल अशा जमिनींवर व इमारतींवर तो प्रथम भार असेल.

१२. जमिनीच्या किंवा इमारतीच्या भागाचा भोगवटा करणाऱ्या व्यक्तीकडून कराची वसुली.

१३. अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असलेल्या व्यक्तीस तिने दिलेला कर जमिनीचा किंवा इमारतीचा भोगवटा करणारी व्यक्ती इत्यादींकडून वसूल करण्याचा हक्क असणे, वगैरे.

१४. जेव्हा जमिनी किंवा इमारती भाड्याने दिल्या असतील व करयोग्य मूल्य भाड्याच्या रकमेपेक्षा अधिक असेल तेव्हा करासंबंधीच्या जबाबदारीची विभागणी करणे.

१५. कलम १३ किंवा १४ अन्वये रकमा वसूल करण्याचे हक्क व उपाय.

१६. करापासून माफी व तो परत करणे.

१७. कर गोळा करण्यात नगरपालिकेने कसूर करणे.

## प्रकरण ४

### विशेष आकारणीसंबंधी तरतुदी

१८. विशेष आकारणी देण्यापासून सूट.

१९. विशेष आकारणी देण्याची प्राथमिक जबाबदारी.

२०. विशेष आकारणीची यादी.

२१. माफी.

२२. पुनरीक्षण.

२२ अ. मुदतीबाबत अधिनियमाच्या विवक्षित तरतुदी अपिलास व पुनरीक्षण अर्जास लागू असणे.

२३. अधिनियमाच्या तरतुदी जेथवर त्या विसंगत नसतील तेथवर या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी लागू असणे.

२४. विशेष आकारणीचे दर कमी करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

## प्रकरण ५

### किरकोळ

२५. पूर्णांकात रक्कम दाखविण्यासंबंधी तरतूद.

२६. नियम करण्याचा अधिकार.

**अनुसूची अ.**

**अनुसूची ब.**

**अनुसूची क.**

# सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७[1]

## [ महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी (उपकर) अधिनियम, १९६२ ]

(राज्यपाल यांची दिनांक १० ऑगस्ट, १९६२ रोजी संमती मिळाल्यानंतर, महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-चार मध्ये दिनांक १३ ऑगस्ट, १९६२ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.)

[१३ ऑगस्ट, १९६२.]

या अधिनियमात पुढील अधिनियमांद्वारे सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम ४५.

सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम २६.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम ३६.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम ५१.

सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम १६.

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम १७. (२९-४-१९७४)*

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम १७. (१०-६-१९७५)*

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम ५३.†

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम २०. (२६-१-१९७९)*

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम ५१.

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम ४५. (१-८-२००७)*

सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम ५. (२२-२-२००८)*

**महाराष्ट्र राज्यात, शिक्षणाच्या अभिवृद्धीसाठी [2][आणि रोजगार हमी योजना कार्यान्वित करण्यासाठी] एक निधी स्थापन करण्यासाठी आणि उपरोक्त प्रयोजनांशी संबंधित असलेल्या बाबींची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी**, महाराष्ट्र राज्यात शिक्षणाच्या अभिवृद्धीसाठी [2][आणि रोजगार हमी योजना कार्यान्वित करण्यासाठी] एक निधी स्थापन करण्यासाठी आणि उपरोक्त प्रयोजनाशी संबंधित असलेल्या बाबींसाठी

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी **महाराष्ट्र शासन राजपत्र**, १९६२, भाग ५, पृष्ठे १६२-१६३ (इंग्रजी) पहा.

[2] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम १७ याच्या अनुसूचीद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

* ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शविते.

† सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम ५३ यांचे कलम ६ पुढीलप्रमाणे आहे :—

या अधिनियमाच्या उपबंधाचे पूर्वलक्षी प्रभावासह प्रवर्तन व व्यावृत्ती.

"६(१) कलमे २ व ५ ही, १ ऑगस्ट १९७६ रोजी अंमलात आली असल्याचे मानण्यात येईल.

(२) कलम ३ हे १० जून १९७५ ला अंमलात आले असल्याचे मानण्यात येईल.

(३) कलम ४ हे १ एप्रिल १९७४ ला अंमलात आले असल्याचे मानण्यात येईल.

(४) या अधिनियमातील कोणतीही गोष्ट कोणत्याही व्यक्तीस, तिने हा अधिनियम **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध होण्यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल पूर्वोक्त तारखेच्या लगतपुर्वी अंमलात असलेल्या विधिअन्वये तिच्यावर जी लादली जाऊ शकली असती त्या शास्तीपेक्षा अधिक शास्ती देण्यास पात्र ठरवले जाणार नाही, परंतु प्रत्येक व्यक्ती, मागणी केली असता देय कराची रक्कम किंवा यथास्थिति या अधिनियमान्वये सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये तिच्याकडून देण्यात आलेल्या व देण्यात यावयाच्या कराच्या रकमेतील फरकाची रक्कम देण्यास जबाबदार असेल किंवा या अधिनियमान्वये सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये आकारणीयोग्य कराच्या रकमेपेक्षा तिने दिलेली कराची रक्कम अधिक असेल त्याबाबतीत उचित परतावा मिळण्यासाठी अर्ज करण्याचा तिला हक्क असेल."

तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या तेराव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यांत येत आहे :—

## प्रकरण १

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव व व्याप्ती. १. (१) या अधिनियमास [१][महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी] (उपकर) अधिनियम, १९६२ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

व्याख्या. २. संदर्भावरून दुसरा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर, या अधिनियमात—

(अ) " वार्षिक भाडेमूल्य " म्हणजे, संबंधित नगरपालिका कायद्याच्या उपबंधानुसार ठरविण्यात आलेले इमारतींचे किंवा जमिनीचे करयोग्य मूल्य किंवा वार्षिक भाडेमूल्य किंवा ठोक वार्षिक भाडेमूल्य, आणि त्यात छावणी अधिनियम, १९२४ याच्या कलम ६४ द्वारे व्याख्या केल्याप्रमाणे वार्षिक मूल्याचा समावेश होतो : १९२४ चा २.

परंतु, जर कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनीच्या भांडवली मूल्यानुसार अशा इमारतीवर किंवा जमिनीवर मालमत्ता कर आकारण्यात येत असेल अशा कोणत्याही बाबतीत राज्य शासन अशा भांडवली मूल्याचे जे शेकडा प्रमाण ठरवील ते प्रमाण वार्षिक भाडेमूल्य म्हणून मानण्यात येईल;

(ब) " आकारणी अधिकारी " म्हणजे, मामलेदार, तहसीलदार, महालकरी किंवा नायब तहसीलदार किंवा अव्वल कारकुनाच्या दर्जाहून ज्याचा दर्जा कमी नसेल असा राज्य शासन ह्या बाबतीत नेमील असा इतर कोणताही महसूल अधिकारी;

(क) " नागपूर शहर " म्हणजे, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ अन्वये, रचना केलेले नागपूर शहर; १९५० चा वऱ्हाड २.

[२][ (ड) " पुणे, सोलापूर व कोल्हापूर शहर " म्हणजे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ अन्वये रचना केलेले पुणे, सोलापूर व कोल्हापूर शहर;] १९४९ चा मुंबई ५९.

[३][ (डअ) " संहिता " म्हणजे, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६; १९६६ चा महा. ४१.

(ई) " जिल्हाधिकारी " या संज्ञेत, या अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्याच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व त्याची कामे पार पाडण्यासाठी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याचा समावेश होतो;

(फ) " व्यापारी पीक " म्हणजे, [३][अनुसूची ब मध्ये] नमूद केलेले कोणतेही पीक;

[४][ (फअ) " ओलिताचे पीक" म्हणजे, ज्या जमिनीला कोणतीही नदी, कालवा, विहीर, किंवा पाण्याचे इतर साधन यापासून पाणी देण्यात येते अशा कोणत्याही जमिनीतून काढण्यात येणारे पीक, परंतु त्यामध्ये केवळ पावसाच्या पाण्यावर काढण्यात येणाऱ्या पिकाचा समावेश होत नाही;]

(ग) "जमिनी " व " इमारती " या संज्ञाचा अर्थ, त्यांना संबंधित नगरपालिका कायद्यात, अनुक्रमे जो अर्थ दिला असेल तोच; असेल

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या अनुसूचीद्वारे " महाराष्ट्र शिक्षण " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम १७, कलम २ (१) द्वारे मूळ खंडाऐवजी खंड (ड) हा दाखल करण्यात आला.

[३] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम १७ याच्या अनुसूचीद्वारे खंड (डअ) आणि (कअ) हे समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम १७, कलम २ (२) द्वारे "अनुसूचित" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

१९२४ चा २.

(ह) " नगरपालिका क्षेत्र " म्हणजे, नगरपालिकेच्या हद्दीतील क्षेत्र, आणि त्यात छावणी अधिनियम, १९२४ अन्वये छावणी म्हणून जाहीर केलेल्या छावणीच्या हद्दीतील क्षेत्राचा समावेश होतो;

[1][(आय) " नगरपालिका " म्हणजे, राज्यात त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये तयार करण्यात आलेली किंवा रचना करण्यात आलेली महानगरपालिका किंवा नगर परिषद;]

(ज) " विहित " म्हणजे, ह्या अधिनियमान्वये केलेल्या नियमानी विहित केलेले;

१८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २. १९२४ चा मुंबई ४८. १९०१ चा मुंबई ३. १९२२ चा मध्यप्रांत व वऱ्हाड २. १९५६ चा हैद्राबाद १८. १९२४ चा २.

(के) " मालमत्ता कर " म्हणजे, बृहन्मुंबईत, [2][पुणे, सोलापूर व कोल्हापूर शहरांत] व नागपूर शहरात, यथास्थिति, मुंबई महानगरपालिका अधिनियमान्वये किंवा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ अन्वये किंवा नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ अन्वये बसविलेला सामान्य कर आणि इतर नगरपालिका क्षेत्रांत, यथास्थिति, मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५ किंवा मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ मध्यप्रांत व वऱ्हाड नगरपालिका अधिनियम, १९२२ किंवा हैद्राबाद जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९५६ किंवा छावणी अधिनियम, १९२४ अन्वये इमारती किंवा जमिनी यावर बसविलेला कर किंवा पट्टी अथवा इमारती किंवा जमिनी यांवरील अशा कराच्या किंवा पट्टीच्या स्वरूपातील कर किंवा पट्टी ;

[3] * * * *

(म) " संबंधित नगरपालिका कायदा " म्हणजे.—

१८८८ चा मुंबई ३.

(एक) बृहन्मुंबईच्या संबंधात, मुंबई महानगरपालिका अधिनियम,

१९४९ चा मुंबई ५९.

(दोन) [4][पुणे, सोलापूर व कोल्हापूर शहराच्या संबंधात], मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९;

१९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २.

(तीन) नागपूर शहराच्या संबंधात, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८;

१९२४ चा २.

(चार) कोणत्याही छावणीच्या संबंधात, छावणी अधिनियम, १९२४;

---

[1] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम १७ याच्या अनुसूचीद्वारे मूळ खंडाऐवजी खंड (आय) हा समाविष्ट करण्यात आला.

[2] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम १७, कलम २ (३) आणि (४) द्वारे " पुणे शहरांत " या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम १७, याच्या अनुसूचीद्वारे खंड (ल) हा वगळण्यात आला.

[4] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम १७, कलम २ (३) आणि (४) द्वारे " पुणे शहरांत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1][ (पाच) महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ यात व्याख्या केल्याप्रमाणे कोणत्याही नगरपालिका क्षेत्राच्या संबंधात, तो अधिनियम ; ] १९६५ चा ४०.

(न) " नियम " म्हणजे, कलम २६ अन्वये केलेले नियम ;

(ओ) " विशेष आकारणी " म्हणजे, कलम ४ [2][ किंवा कलम ६-ब ] अन्वये बसविलेली व वसूल केलेली शेतजमिनीवरील आकारणी.

---

## प्रकरण २

## शिक्षण उपकर [3][* * *]

शिक्षण उपकर. **३.** महाराष्ट्र राज्यात शिक्षणाच्या अभिवृद्धीसाठी करावयाच्या खर्चाची तरतूद करण्यासाठी, यात यापुढे तरतूद केलेल्या रीतीने, लगतपुढील कलमात वर्णन केलेले कर (ज्यांचा यांत यापुढे "शिक्षण उपकर" असा एकत्रित उल्लेख करण्यात आला आहे) बसविण्यात व वसूल करण्यात येतील.

शिक्षण उपकर बसविणे व गोळा करणे. **४.** या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून.—

[4][ (अ) १ एप्रिल १९७४ पासून, यासोबत जोडलेल्या अनुसूची ' अ ' मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी नगरपालिका क्षेत्रातील जमिनीवर व इमारतींवर कर बसविण्यात व गोळा करण्यात येईल ; ]

(ब) (दिनांक १ ऑगस्ट [5][१९७६ ] रोजी किंवा राज्य सरकार राज्यातील कोणत्याही क्षेत्राच्या संबंधात शासकीय राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून, याबाबतीत जी तारीख नेमील अशा इतर कोणत्याही तारखेपासून सुरू होणाऱ्या) महसुली वर्षापासून, अशा जमिनीवर द्यावयाच्या कोणत्याही जमीन महसुलाशिवाय आणखी, राज्यातील ज्या शेतजमिनीवर व्यापारी पिके काढण्यात येतात अशा सर्व जमिनीवर यासोबत जोडलेल्या [6][अनुसूची 'ब' मध्ये ] निर्दिष्ट केलेल्या दरांनी विशेष आकारणी बसविण्यात व वसूल करण्यात येईल मग संबंधित जमीन महसूल संहितेत किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात किंवा करारात तद्विरुद्ध कोणताही मजकूर असो.

विवक्षित बाबतीत शिक्षण उपकरांची आकारणी ठरविण्याची रीत. **५.** या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून.—

(१) नगरपालिका क्षेत्रातील एकाहून अधिक जमिनी किंवा इमारती एकाच व्यक्तीच्या मालकीच्या असतील त्या बाबतीत, जमिनीवरील व इमारतीवरील कर हा, अशा सर्व जमिनीच्या व इमारतींच्या वार्षिक भाडेमूल्यावर आकारण्यात येईल ;

(२) (अ) जेव्हा एकाच जमिनीवर दोन किंवा अधिक व्यापारी पिके किंवा कोणतेही व्यापारी पीक आणि कोणतेही इतर पीक अशी मिश्र पिके काढण्यात येत असतील त्याबाबतीत, प्रत्येक व्यापारी पिकाखालील प्रत्येक क्षेत्र हे राज्य शासनाच्या सामान्य किंवा विशेष आदेशानुसार ठरविण्यात येईल, आणि अशा रीतीने ठरविण्यात आलेल्या प्रत्येक व्यापारी पिकाखालील क्षेत्रावर कलम ४ अन्वये विशेष आकारणी बसविण्यात येईल ;

---

[1] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम १७ याच्या अनुसूचीद्वारे मूळ उपखंड (५), (६), (७) व (८) यांऐवजी हा उपखंड दाखल करण्यात आला.

[2] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम १७ याच्या अनुसूचीद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम ५, कलम ६ द्वारे शीर्षकामधील " व राज्य शिक्षण उपकर निधी " हा मजकूर वगळण्यात आला.

[4] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम १७, कलम ३ (१) (अ) द्वारे मूळ खंड (अ) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[5] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम ५३, कलम २ द्वारे " १९७४ " या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम १७, कलम ३ (१) (ब) (दोन) द्वारे " अनुसूचित " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५ चा

(ब) जेव्हा एकाच जमिनीवर एकाच प्रकारची नसलेली दोन किंवा अधिक व्यापारी पिके एकाच महसुली वर्षात लागोपाठ किंवा अन्यथा काढण्यांत आली असतील त्या बाबतीत अशा रीतीने काढण्यात आलेल्या पिकांच्या प्रत्येक प्रकारच्या बाबतीत कलम ४ अन्वये अशा जमिनीवर विशेष आकारणी बसविण्यात येईल.

[१] [* * *]

[२][प्रकरण २ अ

## रोजगार हमी उपकर

**६-अ.** [३][महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ अन्वये] महाराष्ट्र राज्यात, रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीसाठी साधनसंपत्ती उभारण्याच्या प्रयोजनासाठी, यानंतरच्या कलमात तरतूद केलेल्या रीतीने, कर (यात यापुढे ज्याचा एकत्रितपणे रोजगार हमी उपकर असा निर्देश करण्यात आला आहे) बसविण्यात व गोळा करण्यात येतील. रोजगार हमी उपकर.

**६-ब.** या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून कलम ४ अन्वये बसवलेला कर आणि विशेष आकारणी याशिवाय,— रोजगार हमी उपकर बसविणे आणि गोळा करणे.

(अ) १ एप्रिल १९७५ पासून, यास जोडलेल्या अनुसूची ‘ क ’ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दराने नगरपालिका क्षेत्रातील निवासेतर प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा हेतू असलेल्या जमिनी व इमारती यांवर आणखी कर ;

(ब) संहिता किंवा त्यावेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा किंवा करार यात त्याविरुद्ध काहीही असले तरीही, राज्यातील ज्या जमिनीवर ओलिताची पिके काढण्यात येत असतील अशा सर्व शेतजमिनींवर १ ऑगस्ट १९७५ पासून प्रत्येक हेक्टरला २५ रुपये या दराने आणखी विशेष आकारणी बसविण्यात आणि गोळा करण्यात येईल.

**६-क.** (१) कलम ६-ब, खंड (अ) च्या प्रयोजनासाठी, निवासेतर प्रयोजनासाठी वापरल्या जाणाऱ्या जमिनी किंवा इमारती म्हणजे [४][अनुसूची ‘ क ’ मधील स्पष्टीकरण १ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे] निवासेतर प्रयोजनाकरिता वापरल्या जाणाऱ्या जमिनी किंवा इमारती. निवासेतर प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या जमिनींचा व इमारतींचा अर्थ.

(२) कोणतीही जमीन किंवा इमारत, अंशतः निवासी प्रयोजनासाठी आणि अंशतः निवासेतर प्रयोजनासाठी वापरण्यात येत असेल त्याबाबतीत अनुसूची ‘ क ’ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कराचा दर ठरविण्यासाठी संपूर्ण जमिनीचे किंवा इमारतीचे वार्षिक भाडेमूल्य विचारात घेतले जाईल; परंतु पूर्वोक्त दराने कराच्या प्रत्यक्ष रकमेच्या गणनेसाठी फक्त निवासेतर प्रयोजनासाठी वापरल्या जाणाऱ्या किंवा वापरण्याचा हेतू असलेल्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या भागाचे वार्षिक भाडेमूल्यच विचारात घेतले जाईल.

(३) जेव्हा कोणतीही इमारत किंवा जमीन, निवासी किंवा निवासेतर प्रयोजनासाठी वापरली जाते किंवा वापरण्याचा हेतू आहे किंवा कसे असा कोणताही प्रश्न उद्‌भवेल त्याबाबतीत तो प्रश्न निर्णयाकरता जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवण्यात येईल. संक्षिप्तरीत्या चौकशी केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्याने आपला निर्णय नमूद केला पाहिजे.

(४) राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे संपूर्ण राज्यासाठी किंवा त्याच्या कोणत्याही भागासाठी विहित करील अशा प्राधिकाऱ्याकडे अशा निर्णयाविरुद्ध अपील करता येईल. असे अपील ज्या मुदतीत करता येईल ती मुदत जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय मिळाल्याच्या तारखेपासून साठ दिवस इतकी असेल.

[१] सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम ५, कलम ७ द्वारे कलम ६ वगळण्यात आले.

[२] प्रकरण २अ हे सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम १७ याच्या अनुसूचीद्वारे दाखल करण्यात आले.

[३] सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० च्या अनुसूचीद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम ५३, कलम ३ द्वारे “फायद्यासाठी निवासेतर प्रयोजनांकरिता वापरल्या जाणाऱ्या जमिनी व इमारती” या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(५) पूर्वोक्तप्रमाणे विहित प्राधिकाऱ्याकडे करण्यात येईल त्या अपिलास अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्याने नमूद केलेला निर्णय आणि अशारीतीने विहित केलेल्या प्राधिकाऱ्याचा अपिलावरील आदेश अंतिम असेल.

विवक्षित [illegible] रोजगार हमी उपकर आकारण्याची पद्धती.

**६-ड.** या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून जेव्हा नगरपालिका क्षेत्रातील निवासेतर प्रयोजनांसाठी [illegible] व्यक्तीच्या मालकीच्या असतील त्याबाबतीत जमिनी आणि इमारतींवरील कर हा, अशा सर्व जमिनींच्या आणि इमारतींच्या वार्षिक भाडेमूल्यावर आकारण्यात येईल.]

## प्रकरण ३

## जमिनी व इमारती यांवरील कर वसूल करण्यासंबंधी तरतुदी

विवक्षित जमिनी व इमारती यांना कर भरण्यापासून सूट.

**७.** पुढील जमिनी व इमारती यांना जमीन व इमारती यांवरील कर भरण्यापासून सूट असेल; त्या जमिनी व इमारती अशा :—

(अ) केंद्र सरकारकडे निहित असलेल्या जमिनी व इमारती;

(ब) राज्य शासनाकडे निहित असलेल्या किंवा नगरपालिका, जिल्हा परिषद किंवा छावणी मंडळ यांच्या मालकीच्या असलेल्या आणि सर्वस्वी सार्वजनिक कारणाकरिता ज्या वापरण्यात येत असतील व लाभासाठी ज्यांचा वापर करण्यात येत नसेल किंवा वापरण्याचा इरादा नसेल अशा जमिनी व इमारती;

(क) मुंबई बंदराच्या विश्वस्ताकडे (ट्रस्टी) निहित असलेल्या व लाभासाठी वापरण्यात येत नसलेल्या किंवा वापरण्याचा इरादा नसलेल्या इमारती व जमिनी;

(ड) (मुंबई पोर्ट ट्रस्ट अधिनियम, १८७९ यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेले) जे धक्के, गोद्या, पिअर, रेल्वे व दीपगृहे मुंबई बंदराच्या ट्रस्टीकडे निहित असतील व ज्यांचा तसा उपयोग करण्यात येत असेल ते धक्के, गोद्या, पिअर, रेल्वे व दीपगृहे आणि राज्य शासन याबाबत अधिसूचित करील अशी उक्त ट्रस्टीकडे निहित असलेली इतर मालमत्ता; १८७९ चा मुंबई ६.

(ई) मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी केलेल्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या [1][किंवा वक्फांबाबत अधिनियम, १९५४ अन्वये नोंदणी केलेल्या वक्फाच्या] मालकीची असलेल्या व केवळ सार्वजनिक उपासनेसाठी किंवा धर्मार्थ कारणांसाठी भोगवटा करण्यात येत असलेल्या जमिनी व इमारती किंवा त्यांचे भाग; १९५० चा मुंबई २९. १९५४ चा २९.

(फ) ज्यांचे वार्षिक भाडेमूल्य पंचाहत्तर रुपयांपेक्षा कमी असेल अशा जमिनी आणि इमारती;

[2][(फ-क) परस्पर देवाणघेवाणीच्या तत्त्वावर, राज्यातील परराष्ट्र वाणिज्य दूतावासाच्या मालकीच्या जमिनी आणि इमारती;]

(ग) (बृहन्मुंबई आणि पुणेच्या [3][सोलापूर, कोल्हापूर] व नागपूर या शहरांच्या हद्दीत असतील अशा जमिनीव्यतिरिक्त इतर) खुल्या जमिनी.

---

[1] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम ४५, कलम २ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम ५१, कलम २ द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम १७, कलम ५ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या प्रयोजनांकरिता—

(१) पुढील जमिनी व इमारती किंवा त्यांचे भाग यांचा केवळ सार्वजनिक उपासनेसाठी किंवा धर्मार्थ कारणांसाठी भोगवटा करण्यात येतो असे मानण्यात येणार नाही :—

(अ) ज्यांत व्यापार किंवा धंदा चालविण्यात येतो अशा इमारती व जमिनी; आणि

(ब) ज्याच्यापासून भाडे मिळते अशा इमारती व जमिनी मग अशा भाड्याच्या [illegible] एकमात्र धार्मिक किंवा धर्मार्थ कारणांसाठी करण्यात येत असो वा नसो;

(२) कोणत्याही जमिनीच्या किंवा इमारतीच्या कोणत्याही भागाचा केवळ सार्वजनिक उपासनेसाठी किंवा धर्मार्थ कारणांसाठी भोगवटा करण्यात येतो ह्या कारणावरून त्यांच्या बाबतीत, करापासून सूट देण्यात आली असेल त्याबाबतीत, असा भाग, स्वतंत्र मालमत्ता म्हणून मानण्यात येणार नाही.

(३) "खुली जमीन" म्हणजे ज्या जमिनीवर कोणतेही बांधकाम करण्यात आलेले नाही किंवा जी परिवेष्टित नाही अशी जमीन.

जमिनी व इमारती यांवरील कर भरण्याची प्राथमिक जबाबदारी.

८. (१) कोणत्याही जमिनीचा किंवा इमारतीचा प्रत्यक्ष भोगवटा करणारी व्यक्ती अशा जमिनीची किंवा इमारतीची मालक असेल, अथवा शासनाने किंवा शासनाच्या वतीने दिलेला इमारत पट्टा किंवा इतर पट्टा, याद्वारे अथवा कोणत्याही व्यक्तीने किंवा स्थानिक प्राधिकरणाने दिलेला इमारत पट्टा किंवा इतर पट्टा याद्वारे तो त्या धारण करीत असतील तर, प्रत्यक्ष भोगवटा करणाऱ्या व्यक्तीवर प्रथमतः कर बसविण्यात येईल.

(२) इतर कोणत्याही बाबतीत, कर प्रथमतः पुढीलप्रमाणे बसविण्यात येईल :—

(अ) जमीन किंवा इमारत भाड्याने दिली असेल तर, ती पट्ट्याने देणाऱ्या व्यक्तीवर;

(ब) जमीन किंवा इमारत पोट-भाड्याने दिली असेल तर, वरिष्ट पट्टाकारावर;

(क) जमीन किंवा इमारत भाड्याने दिलेली नसेल तर, ती भाड्याने देण्याचा हक्क जिच्याकडे निहित असेल त्या व्यक्तीवर.

कर वगैरे गोळा करण्यास सक्षम असलेले प्राधिकारी.

९. (१) असा कर—

[१][(अ) छावण्यांमध्ये जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याकडून; आणि]

(ब) इतर नगरपालिकाक्षेत्रात, नगरपालिकेकडून;

गोळा करण्यात येईल.

(२) या अधिनियमान्वयेच्या कराची (कोणतीही शास्ती धरून) बसुली पुढीलप्रमाणे करण्यात येईल;

(अ) [२][* * * *] छावण्यांमध्ये, जमीनमहसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे;

(ब) कोणत्याही इतर नगरपालिका क्षेत्रात, ज्या पद्धतीने त्या क्षेत्रात संबंधित नगरपालिका विधिअन्वये मालमत्ता कर वसूल केला जातो त्याचपद्धतीवर; परंतु कोणत्याही नगरपालिका क्षेत्रात, नगरपालिकेकडून कर आकारला जात नसेल तर, उक्त कर, विहित करण्यात येईल अशा पद्धतीने, वसूल केला जाईल.

(३) कोणत्याही, नगरपालिकेच्यावतीने, ह्या अधिनियमान्वये करावयाची कराची व शास्तीदाखलच्या रकमेची वसुली, ही ज्या कायद्याखाली नगरपालिकेची रचना झाली असेल त्या कायद्याअन्वये अशा नगरपालिकेच्यावतीने मालमत्ता कर वसूल करण्यासाठी नेमलेल्या योग्य नगरपालिका अधिकाऱ्याकडून केली जाईल.

(४) कर गोळा करण्याबाबतच्या खर्चाच्या संबंधात, त्या बाबतीत विहित करण्यात येईल असा वटाव मिळण्यास नगरपालिका पात्र असेल व निरनिराळ्या नगरपालिका क्षेत्रासाठी वटाव मिळण्याबाबत निरनिराळ्या दरांची तरतूद करता येईल.

---

[१] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम २६, कलम ३, दुसरी अनुसूची याद्वारे मूळ खंड (अ) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[२] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम २६, कलम ३, दुसरी अनुसूची याद्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

*कर देण्यात कसूर केल्यास शास्ती.*

**१०.** (१) कलम ९ च्या तरतुदीनुसार कराच्या वसुलीसाठी मागणीची नोटीस बजावण्यात आल्यावर कोणतीही व्यक्ती जर कराच्या संबंधात त्याजकडून येणे असलेली रक्कम नोटीशीत नमूद केलेल्या मुदतीत देण्यात कसूर करील तर, नगरपालिकेस किंवा यथास्थिती [1][* * * *] जिल्हाधिकाऱ्यास, अशा व्यक्तीने कर देण्यात जाणूनबुजून कसूर केलेली आहे त्याबद्दल त्याची खात्री झाल्यानंतर, राज्य शासनाच्या सामान्य किंवा विशेष आदेशांस अधीन राहून, [illegible] दिलेल्या कराच्या रकमेच्या एक-दशांशाहून जास्त नसेल अशी आणखी रक्कम शास्ती म्हणून त्यांच्याकडून वसूल करता येईल.

(२) कलमान्वये वसुलीयोग्य असलेल्या सर्व रकमा, कलम ९ मध्ये कर गोळा करण्यासाठी तरतूद केलेल्या रीतीने, वसूल करण्यात येतील.

*ज्या जमिनींवर व इमारतींवर कर आकारता येईल त्या जमिनींवर व इमारतींवर असा कर हा प्रथम भार असणे.*

**११.** कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी व कोणत्याही करारांतून किंवा इतर प्रकारे कोणतेही हक्क उद्‌भवत असले तरीही, कोणत्याही जमिनीच्या किंवा इमारतीच्या संबंधात, कर किंवा शास्ती म्हणून येणे असलेली सर्व रक्कम ही राज्य शासनाला त्यासंबंधी (कोणत्याही) जमीन महसूल येणे असल्यास असा जमीन महसूल शासनाला अगोदर देण्यात येईल या शर्तीस अधीन राहून--

(अ) शासनाकडून प्रत्यक्ष धारण कोणत्याही जमिनीच्या किंवा इमारतीच्या बाबतीत अशा करास किंवा शास्तीस पात्र असलेल्या व्यक्तीचा अशा जमिनीत किंवा इमारतीत जो हितसंबंध असेल त्या हितसंबंधावर, व अशा जमिनींत किंवा जमिनींवर किंवा इमारतीत किंवा इमारतींवर आढळलेल्या व अशा व्यक्तींच्या मालकीचा असलेल्या मालावर व इतर कोणती जंगम मालमत्ता असल्यास त्या मालमत्तेवर; आणि

(ब) इतर कोणत्याही जमिनीच्या किंवा इमारतीच्या बाबतीत अशा जमिनीवर किंवा इमारतीवर आणि अशा जमिनीत किंवा जमिनींवर किंवा इमारतींवर आढळलेला असा कर शास्ति देण्यास पात्र असलेल्या व्यक्तीच्या मालकीच्या मालावर व इतर कोणती जंगम मालमत्ता असल्यास त्या मालमत्तेवर; प्रथम भार असेल.

*जमिनीच्या किंवा इमारतीच्या भागाचा भोगवटा करणाऱ्याकडून कराची वसुली करणे.*

**१२.** कराची रक्कम देण्यास प्रथमतः जबाबदार असलेल्या व्यक्तींकडून कराच्या संबंधात येणे असलेली रक्कम वसूल झाली नाही तर ज्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या संबंधात कर येणे असेल त्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या कोणत्याही भागाचा भोगवटा करणाऱ्याकडून अशा भोगवटादारास जे वार्षिक भाडे द्यावे लागत असेल त्या भाड्याची रक्कम व उक्त जमीन किंवा इमारत यांचे वार्षिक भाडेमूल्य या दोहोंमध्ये जे प्रमाण असेल तेच प्रमाण येणे असलेल्या कराच्या एकूण रकमेबरोबर ज्या रकमेचे असेल तेवढ्याच रकमेचा भाग वसूल करता येईल.

*अधिनियमान्वये कर देण्यास पात्र असलेल्या व्यक्तीस तिने दिलेला कर, जमिनीचा किंवा इमारतीचा भोगवटा करणारा इत्यादींकडून वसूल करण्याचा हक्क असणे, वगैरे.*

**१३.** (१) कलम ८ च्या तरतुदीन्वये ज्या व्यक्तीकडून कर वसूल करता येईल, अशी कोणतीही व्यक्ती कोणत्याही जमिनीच्या किंवा इमारतीच्या बाबतीत कर देईल व ज्या मुदतीसाठी तिने तो कर भरला असेल त्या मुदतीत त्या व्यक्तीने त्या जमिनीचा किंवा इमारतीचा भोगवटा केला नसेल तर, तिला उपरोक्त मुदतीत ती जमीन किंवा इमारत ज्या व्यक्तीच्या (अशी कोणती व्यक्ती असल्यास) प्रत्यक्ष भोगवट्यात असेल त्या व्यक्तीकडून अशा कराची रक्कम मिळण्याचा हक्क असेल.

(२) ज्या इमारतीच्या संबंधात कर भरण्यात आला असेल त्या इमारतीत एकाहून अधिक गाळ्यांचा समावेश असेल, आणि त्या इमारतीच्या संबंधातील कर निकटपुर्वीच्या पोट-कलमात निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीने किंवा तिच्यावतीने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने भरला असेल तर अशा व्यक्तीस, ज्या मुदतीबद्दल कर देय असेल त्या मुदतीबद्दल गाळ्यांचा भोगवटा करणाऱ्या व्यक्तीकडून, असा प्रत्येक गाळा ज्या भाड्यावर भाड्याने देण्यात आला असेल त्या भाड्याच्या प्रमाणात, यथाप्रमाणे कर वसूल करण्याचा अधिकार असेल परंतु, जर :—

[1] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम २६, कलम ३, दुसरी अनुसूची याद्वारे "पुण्याच्या किंवा नागपूरच्या" हा मजकूर वगळण्यात आला.

(अ) अशा गाळ्यांपैकी कोणताही गाळा अशा व्यक्तीच्या किंवा तिच्यावतीने काम करणाऱ्या व्यक्तीच्या भोगवट्यांत असेल; किंवा

(ब) भाडेदारीच्या शर्तीनुसार, अशा व्यक्तीने, गाळ्याचा भोगवटा करणाऱ्यांसाठी कर देण्याचे कबूल केले असेल,

तर, अशा गाळ्याच्या बाबतीत, यथाप्रमाणे द्यावयाची रक्कम, इतर गाळ्यांच्या भोगवटा करणाऱ्याकडून वसूल करण्यात येता कामा नये.

(३) ह्या कलमान्वये भोगवटा करणाऱ्याकडून केलेली कराच्या कोणत्याही रकमेची वसुली ही, मुंबई भाडे नियंत्रण आणि पथिकाश्रम व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७ याच्या कलम ७ च्या किंवा राज्याच्या कोणत्याही भागात अंमलात असलेल्या कोणत्याही तत्सम कायद्याच्या कारणाकरिता वाढ आहे असे समजण्यात येणार नाही.

१९४७ चा मुंबई ५७.

**स्पष्टीकरण.**—ह्या कलमांत "गाळा" म्हणजे एक स्वतंत्र भाग म्हणून भाड्याने दिलेली किंवा भाड्याने देऊ केलेली खोली किंवा खोल्यांचा गट.

जेव्हा जमिनी किंवा इमारती भाड्याने दिल्या असतील व करयोग्य मूल्य हे भाड्याच्या रकमेपेक्षा अधिक असेल तेव्हा कर दायित्वाची विभागणी करणे.

**१४.** (१) ज्या जमिनीवर कर आकारण्यात आला आहे अशी कोणतीही जमीन किंवा इमारत भाड्याने दिली असेल व तिचे करयोग्य मूल्य, कलम ८ च्या उपबंधान्वये उक्त कर ज्या व्यक्तीकडून वसूल करता येत असेल त्या व्यक्तीस उक्त जमिनीच्या वा इमारतीच्या संबंधात द्यावयाच्या भाड्याच्या रकमेपेक्षा अधिक होत असेल तर, उक्त व्यक्तीस, तिच्यावर बसविण्यात आलेली अशा कराची रक्कम व तिला देय असलेल्या भाड्याच्या रकमेच्या आधारे उक्त कराची गणना करण्यात आली तर जी रक्कम तिच्यावर बसविण्यात आली असती ती रक्कम या दोहोंमधील तफावतीएवढी रक्कम, आपल्या भाडेकऱ्याकडून मिळण्याचा हक्क असेल.

(२) जर जमीन किंवा इमारत पोट-भाड्याने दिली असेल व तिचे करयोग्य मूल्य हे तिच्या बाबतीत भाडेकऱ्यास त्याच्या पोट-भाडेकऱ्याने द्यावयाच्या भाड्याच्या रकमेपेक्षा किंवा पोट-भाडेकऱ्यास, त्याच्यामार्फत ती धारण करणाऱ्या व्यक्तीने द्यावयाच्या भाड्याच्या रकमेपेक्षा अधिक होत असेल तर, उक्त भाडेकऱ्यास यथास्थिति त्याच्या पोट-भाडेकऱ्याकडून किंवा उक्त पोट-भाडेकऱ्यास त्यांच्यामार्फत ती धारण करणाऱ्या व्यक्तीकडून, निकटवर्ती पोट-कलमान्वये अशा भाडेकऱ्याकडून किंवा पोट-भाडेकऱ्याकडून वसूल केलेली कोणतीही रक्कम व उक्त जमिनीचे किंवा इमारतीचे करयोग्य मूल्य हे, अशा भाडेकऱ्यास किंवा पोट-भाडेकऱ्यास मिळत असलेली भाड्याची रक्कम व तो देत असलेल्या भाड्याची रक्कम यांतील तफावतीइतके असते तर उक्त इमारत वा जमीन यांचे संबंधात कराची जी रक्कम बसविता आली असती ती रक्कम या दोहोंमधील तफावतीइतकी रक्कम मिळण्याचा हक्क असेल.

कलम १३ किंवा १४ अन्वये रकमा वसूल करण्याचे हक्क व उपाय.

**१५.** कलम १३ किंवा १४ अन्वये कोणतीही रक्कम मिळण्याचा हक्क असलेल्या कोणत्याही व्यक्तीस ती वसूल करण्याच्या बाबतीत, अशी रक्कम ज्या व्यक्तीकडून मिळण्याचा तिला हक्क असेल त्या व्यक्तीने ती रक्कम तिला भाडे म्हणून द्यावयाची रक्कम असल्याप्रमाणे तिच्या वसुलीसाठी तिला जे हक्क बजावता आले असते व जे उपाय करता आले असते तेच हक्क बजावता येतील व तेच उपाय करता येतील.

करापासून माफी व तो परत करणे.

१६. (१) जेव्हा कोणत्याही जमिनींवर किंवा इमारतीवर कर निर्धारित करण्यात आला असेल आणि अशा जमिनीच्या किंवा इमारतीच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संबंधात, संबंधित नगरपालिका कायद्याखाली दिनांक १ ऑक्टोबर १९६२ रोजी किंवा त्यानंतर, मालमत्ता कराच्या बाबतीत करप्रतिग्रह [illegible] किंवा अशी रक्कम परत करण्यास मंजुरी देण्यात आली असेल किंवा असा करप्रतिग्रह (ड्रॉ-बॅक), किंवा माफी देण्यात आली असेल किंवा अशा कराची रक्कम परत करण्यात आली असेल त्याबाबतीत, यथास्थिति, नगरपालिकेने किंवा जिल्हाधिकाऱ्याने विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तीस अधीन राहून, अशा कराच्या रकमेच्या विहित करण्यात येईल अशा भागापासून माफी दिली पाहिजे किंवा ती परत केली पाहिजे.

(२) कर निर्धारण केलेली कोणतीही इमारत बृहन्मुंबईत किंवा [1][पुणे, सोलापुर, कोल्हापूर] किंवा नागपूर या शहरात असेल आणि नगरपालिका आयुक्तांच्या आदेशाखेरीज इतर प्रकारे, ती इमारत किंवा तिचा कोणताही भाग पाडून टाकण्यात आला असेल किंवा काढून टाकण्यात आला असेल आणि अशा रीतीने ती इमारत किंवा तिचा भाग पाडून टाकल्याबद्दल संबंधित नगरपालिका कायद्याखाली आयुक्तास नोटीस देण्यात आली असेल त्याबाबतीत अशा कायद्याखाली रचना करण्यात आलेल्या महानगरपालिकेने, विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तीस अधीन राहून, अशा कराच्या रकमेच्या, विहित करण्यात येईल अशा भागापासून माफी दिली पाहिजे किंवा तो परत केला पाहिजे.

(३) ज्या गोष्टींवरून कोणत्याही व्यक्तीस या कलमान्वये माफी किंवा रक्कम परत मिळण्याचा हक्क प्राप्त होतो त्या गोष्टी सिद्ध करण्याचा भार तिच्यावर राहील.

कर गोळा करण्यात नगरपालिकेने कसूर करणे.

१७. (१) या अधिनियमान्वये जमिनींवर किंवा इमारतींवर आकारण्यात आलेल्या करादाखल येणे असलेली कोणतीही रक्कम गोळा करण्यात किंवा ती राज्य शासनाकडे भरण्यात कोणतीही नगरपालिका कसूर करील तर, राज्य शासनास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, अशी रक्कम गोळा करण्यासाठी किंवा ती भरण्यासाठी मुदत ठरवून देता येईल.

(२) अशा रीतीने ठरवून दिलेल्या मुदतीत अशी रक्कम गोळा करण्यात आली नाही किंवा ती देण्यात आली नाही तर, राज्य शासनाला अशा नगरपालिकेकडे निहित असलेल्या निधीसंबंधीच्या कोणत्याही कायद्यात किंवा त्या-त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यात काहीही असले तरी, नगरपालिकेचे कोणतेही पैसे ज्या बँकेत जमा करण्यात येत असतील त्या बँकेस किंवा ज्यात नगरपालिकेचे पैसे जमा करण्यात येत असतील ते शासकीय कोषागार किंवा पैसे सुरक्षित ठेवण्याची इतर कोणतीही जागा ज्याच्या ताब्यात असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, नगरपालिकेच्या खाती अशा बँकेत जमा असलेल्या किंवा अशा व्यक्तींच्या हाती असलेल्या पैशातून किंवा अशी बँकेस किंवा व्यक्तीस नगरपालिकेकडून किंवा तिच्यावतीने ठेव म्हणून, वेळोवेळी मिळतील अशा पैशातून ती रक्कम देण्याविषयी निदेश देता येईल आणि अशा बँकेस किंवा व्यक्तीस त्या निदेशाचे पालन करणे बंधनकारक असेल.

(३) पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या आदेशानुसार देण्यात आलेल्या प्रत्येक रकमेवरून अशा बँकेत किंवा अशा व्यक्तीकडे नगरपालिकेच्या अशा रीतीने जमा करण्यात आलेल्या पैशातून बँकेने किंवा व्यक्तीने, अशा रीतीने दिलेल्या कोणत्याही रकमेबाबत, नगरपालिकेसंबंधी असलेल्या सर्व जबाबदारीतून अशा बँकेची किंवा व्यक्तीची पुरेशा रीतीने मुक्तता झाली आहे असे समजण्यात येईल.

---

[1] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम १७, कलम ६ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

## प्रकरण ४

## विशेष आकारणी संबंधी तरतुदी

१८. [1][(१)] या अधिनियमान्वये पुढीलपैकी कोणत्याही जमिनीवर विशेष आकारणी बसविता येणार नाही :— विशेष आकारणी पासून सूट.

[2][* * * * * *]

(क) ज्या जमिनीचा उपयोग रोपमळा (नर्सरी) म्हणून—म्हणजेच इतर ठिकाणी रोपे लावण्याच्या हेतूने लहान रोपे तयार करण्यासाठी करण्यात येत असेल अशी जमीन; किंवा

(ड) ज्या जमिनीवर लावण्यात आलेल्या फळझाडांना फळे येण्यास सुरुवात झाली नसेल अशी जमीन; किंवा

(ई) कोणत्याही महसुली वर्षात, ज्या जमिनीवर लावण्यात आलेल्या व्यापारी पिकांची [3][ किंवा ओलिताच्या पिकांची ] त्याच महसुली वर्षात कापणी होण्याचा संभव नसेल अशी जमीन.

[4][* * * * *]

[5][(२) ज्यावर ओलिताचे पीक काढले जाते अशा कोणत्याही धारण जमिनीतील ०.४ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र नसणाऱ्या जमिनीच्याबाबतीत, कलम ६-ब अन्वये विशेष आकारणी बसवली जाणार नाही; आणि ओलिताचे पीक घेण्यात येणाऱ्या ०.४ हेक्टरपेक्षा जास्त जमीन असलेल्या धारण जमिनीबाबत, विशेष आकारणीची परिगणना करताना, ०.४ हेक्टर इतकी जमीन केव्हाही विचारात घेतली जाणार नाही.

**स्पष्टीकरण.**—पोट-कलम (२) च्या प्रयोजनासाठी, एखाद्या व्यक्तीच्या बाबतीत धारण जमीन म्हणजे, अशा व्यक्तीने मालक म्हणून किंवा कुळ म्हणून, धारण केलेली व प्रत्यक्ष त्याच्या कायदेशीर कब्जात असलेली एकूण जमीन.]

१९. (१) ज्या जमिनीवर व्यापारी पिके [6][ किंवा, यथास्थिति, ओलिताची पिके ] काढण्यात येत असतील ती जमीन ज्याच्या प्रत्यक्ष कब्जात असेल त्या व्यक्तीकडून विशेष आकारणीची रक्कम, प्रथमतः वसूल करण्यात येईल. विशेष आकारणी देण्याची प्राथमिक जबाबदारी.

(२) पूर्ववर्ती पोट-कलमान्वये विशेष आकारणी देण्यास प्रथमतः जबाबदार असलेली कोणतीही व्यक्ती अशी विशेष आकारणीची रक्कम देण्यात कसूर करील तर, [7][संहिते अन्वये ] अशा जमिनीच्या संबंधात जमीन महसूल देण्यास जी कोणतीही व्यक्ती प्रथमतः जबाबदार असेल त्या व्यक्तीकडून अशा विशेष आकारणीची रक्कम वसूल करण्यात येईल ; आणि इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, अशा व्यक्तीस, तिच्याकडून अशा रीतीने वसूल करण्यात आलेल्या कोणत्याही रकमेदाखल, जी व्यक्ती पूर्ववर्ती पोट-कलमान्वये विशेष आकारणीची रक्कम देण्यास प्रथमतः जबाबदार असेल त्या व्यक्तीच्या हिशोबामध्ये जमा खाती नोंद करून मिळण्याचा हक्क असेल.

---

[1] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम १७, च्या अनुसूचीद्वारे कलम १८ ला पोट-कलम (१) असा नव्याने क्रमांक देण्यात आला.

[2] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम १७, कलम ७, अन्वये खंड (अ), (ब) आणि स्पष्टीकरण वगळण्यात आले.

[3] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम १७, याच्या अनुसूचीद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम १७, कलम ७ अन्वये खंड (अ), (ब) आणि स्पष्टीकरण वगळण्यात आले.

[5] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम १७, च्या अनुसूचीद्वारे कलम १८ चे पोट-कलम (२) नव्याने दाखल करण्यात आले.

[6] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम १७, याच्या अनुसूचीद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[7] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम १७, याच्या अनुसूचीद्वारे "संबंधित जमीन महसूल अधिनियमान्वये" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**स्पष्टीकरण.**—कोणत्याही जमिनीच्या संबंधात जमीन महसूल देण्यातून सर्वस्वी किंवा अंशतः सूट देण्यात आली असेल तर, त्याबाबतीत, या कलमाच्या प्रयोजनासाठी, जमीन महसूल देण्यास प्रथमतः जबबादार असलेली व्यक्ती म्हणजे, अशा जमिनीच्या संबंधात जमीन महसूल देणे भाग पडले असते तर जी व्यक्ती असा जमीन महसूल देण्यास पात्र ठरली असती ती व्यक्ती.

विशेष आकारणीची यादी. २०. (१) [illegible] आणि तद्नंतर येणाऱ्या प्रत्येक महसुली वर्षाच्या सुरुवातीस, आकारणी अधिकारी राज्य शासनाच्या सामान्य किंवा विशेष आदेशास अधीन राहून, एक यादी (जिचा यात यापुढे "विशेष आकारणीची यादी" असा निर्देश करण्यात आला आहे) तयार करवून घेईल आणि अशा यादीत, त्याच्या क्षेत्राधिकारात असलेल्या प्रत्येक गावातील ज्या कोणत्याही व्यक्ती विशेष आकारणीची रक्कम देण्यास कलम १९ अन्वये प्रथमतः जबाबदार असतील त्या व्यक्तींची नावे, अशा व्यक्तींनी धारण केलेल्या जमिनींचे एकरी क्षेत्र व त्या जमिनींतून काढण्यात येणारे व्यापारी पीक [१][ किंवा, यथास्थिति, ओलिताची पिके ], ज्या जमिनीतून असे पीक काढण्यात येत असेल त्या जमिनीसंबंधात बसविता येईल अशी विशेष आकारणीची रक्कम, आणि विहित करण्यात येईल असा इतर तपशील समाविष्ट केलेला असेल.

(२) विशेष आकारणीची यादी तयार करण्यात आल्यानंतर, अशा यादीचा ज्या गावांशी संबंध येत असेल त्या गावांत ती यादी, विहित केलेल्या रीतीने, प्रसिद्ध करण्यात येईल ; अशी यादी प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या मुदतीच्या आत, त्या यादीच्या किंवा त्यांतील कोणत्याही तपशिलाच्या बिनचूकपणाबद्दल आक्षेप घेणारा कोणताही अर्ज, अशा यादीत हितसंबंध असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडून करण्यात आला नाही तर अशी यादी कलम २२ च्या तरतुदीस अधीन राहून अंतिम असेल.

(३) जर कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीने उपरोक्त मुदतीच्या आत, विहित करण्यात आलेल्या रीतीने, आकारणी अधिकाऱ्याकडे अर्ज करुन, त्याद्वारे, अशा यादीच्या किंवा त्यातील कोणत्याही तपशिलाच्या बिनचूकपणाबद्दल आक्षेप घेतला असेल तर, आकारणी अधिकाऱ्याने अर्जदारास आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर, विहित केलेल्या रीतीने त्या आक्षेपाचा निर्णय केला पाहिजे आणि [२][ संहितेत ] काहीही अंतर्भूत असले तरी, असा निर्णय हा, [३][ त्यावर विहित केलेल्या रीतीने, निर्णयाच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, जिल्हाधिकाऱ्याकडे केलेल्या अपिलास किंवा कलम २२ खालील पुनरीक्षणाच्या कोणत्याही कामकाजास अधीन राहून, अखेरचा असेल. ]

माफी. २१. (१) कोणतेही व्यापारी पीक [१][ किंवा, यथास्थिति, ओलिताचे पिक ] कोणत्याही वर्षात बुडाले असेल त्याबाबतीत राज्य सरकारने केलेल्या कोणत्याही नियमास अधीन राहून, आकारणी अधिकाऱ्यास, आकारणी देण्यास पात्र असलेल्या व्यक्तीकडून अर्ज मिळाल्यानंतर, त्या प्रकरणाच्या परिस्थितीनुसार त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, विशेष आकारणीत, सूट देण्याबाबत आदेश देता येईल.

(२) आकारणी अधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या अशा कोणत्याही व्यक्तीस आदेशाच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील दाखल करता येईल.

(३) या कलमान्वये सूट मिळण्याबाबतचा कोणताही अर्ज नाकारण्यापूर्वी आकारणी अधिकारी किंवा जिल्हाधिकारी, अर्ज नाकारण्याबाबतची आपली कारणे नमूद करील.

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम १७, याच्या अनुसूचीद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम १७, याच्या अनुसूचीद्वारे "संबंधित जमीन महसूल अधिनियमात" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम ३६, कलम ३ द्वारे "त्यावर विहित केलेल्या" या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "अखेरचा असेल," या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**२२.** (१) राज्य शासनास, (किंवा राज्य शासनाच्या उप-सचिवाच्या दर्जाहून कमी दर्जा नसेल-अशा, त्या शासनाने पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्यांस) स्वतः होऊन, किंवा अर्ज करण्यात आल्यानंतर, कोणत्याही अधिकाऱ्याने या प्रकरणान्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे कागदपत्र मागवून, त्यांची तपासणी करुन त्यावर त्यास न्याय्य व योग्य वाटेल असा आदेश देता येईल : पुनरीक्षण.

परंतु, या कलमान्वयेचा कोणताही अर्ज आदेशाच्या दिनांकापासून चार महिन्याच्या कालावधीत केला नसेल तर विचारात घेतला जाणार नाही :

तसेच अशा कोणत्याही आदेशाचे पुनरीक्षण करण्याबाबतचा कोणताही अर्ज नाकारण्यापूर्वी, राज्य शासन किंवा पदनिर्देशित केलेला अधिकारी असा अर्ज नाकारण्याबद्दलची आपली कारणे नमूद करील.

(२) राज्य शासनाने किंवा, यथास्थिति, पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याने, या कलमाखाली कोणत्याही व्यक्तीवर प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव असेल असा कोणताही आदेश अशा व्यक्तीस आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यावाचून, काढता कामा नये.

(३) या प्रकरणान्वये एखादी व्यक्ती अपील करु शकत असेल आणि तिच्याकडून कोणतेही अपील दाखल केले गेले नसेल तर, अशा व्यक्तीने या कलमान्वये पुनरीक्षणासाठी अर्ज केल्यास तत्संबंधी कोणतेही कामकाज दाखल करुन घेता कामा नये.

१९६३ चा ३५. [१][**२२-अ.** मुदत अधिनियम, १९६३ याची कलमे ४, ५ व १२ च्या तरतुदी, शक्यतोवर, कलम २० किंवा कलम २१ अन्वये अपील दाखल करण्याची मुदत किंवा कलम २२ अन्वये पुनरीक्षणासाठी अर्ज सादर करण्याची मुदत मोजताना लागू असतील.] मुदतीबाबत अधिनियमाच्या विवक्षित तरतुदी अपिलास व पुनरीक्षण अर्जास लागू असणे.

**२३.** [२][संहितेच्या] तरतुदी यांत अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टींशी जेथवर विसंगत नसतील तेथवर, त्या विशेष आकारणीच्या यादीत निर्दिष्ट केलेल्या व्यक्तींकडून, ह्या अधिनियमान्वये आकारणीयोग्य अशा विशेष आकारणीच्या वसुलीस, जणू काही अशी विशेष आकारणी ही [२][संहिते-अन्वये] द्यावयाचा जमीन महसूल आहे असे समजून, लागू असतील. [३][विशेष आकारणीच्या अधिक कार्यक्षम वसुलीसाठी [४][कलम ६-ब अन्वये बसविता येईल अशा विशेष आकारणीव्यतिरिक्त] ग्रामपंचायती महसूल अधिकाऱ्यांना सहाय्य करतील आणि त्यांनी आपापल्या अधिकारितेत केलेल्या विशेष आकारणीच्या वसुलीच्या निव्वळ उत्पन्नाच्या दहा टक्के रक्कम पंचायतीस देता येईल.] [२][संहितेच्या] तरतुदी जेथवर त्या विसंगत नसतील तेथवर या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी लागू असणे.

**२४.** राज्य शासनास **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, ज्या जमिनीत कोणत्याही व्यापारी पिकाची लागवड केली जाते अशा जमिनीच्या संबंधात [५][अनुसूची 'ब' मध्ये] निर्दिष्ट केलेला विशेष आकारणीचा दर कमी करता येईल. तसेच त्यास, तत्सम अधिसूचनेद्वारे, कोणतीही नोंद वगळता येईल, किंवा कोणत्याही बाबतीत विशेष आकारणीच्या दरांत वाढ होणार नाही अशा रीतीने, तीत सुधारणा करता येईल आणि त्यानंतर [५][अनुसूची 'ब' मध्ये] तदनुसार सुधारणा करण्यात आली आहे असे समजण्यात येईल. विशेष आकारणीचे दर कमी करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

---

[१] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम ३६, कलम ४ द्वारे हे कलम दाखल करण्यात आले.

[२] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम १७, च्या अनुसूचीद्वारे "संबंधीत जमीन महसूल अधिनियमाचे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम १७, कलम ८ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम १७ च्या अनुसूचीद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम १७, कलम ९ द्वारे "अनुसूचीत" मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][ज्या जमिनीवर कोणतेही ओलिताचे पीक काढले जात असेल अशा जमिनींच्या बाबतीत, कलम ६-ब अन्वये विहित केलेल्या आणखी विशेष आकारणीचा दर राज्य शासनास, तशाच अधिसूचनेद्वारे, कमी करता येईल आणि त्यानंतर अशा ओलिताच्या पिकाच्या संबंधात कलम ६-ब मध्ये तद्नुसार सुधारणा करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.]

## प्रकरण ५

## **किरकोळ**

पूर्णाकांत रक्कम दाखविण्या-संबंधी तरतूद.

२५. या अधिनियमान्वये द्यावयाच्या शिक्षण उपकराची [२][किंवा, यथास्थिति, रोजगार हमी उपकराची] संगणना करताना बसवावयाच्या रकमेचे आवश्यक असेल तेथे, जवळच्या रुपयात रूपांतर करण्यात येईल, म्हणजेच पन्नास नया पैशाचा भाग व त्यावरील रक्कम एक रुपया म्हणून मोजण्यात येईल आणि पन्नास नया पैशांहून कमी असलेली रक्कम विचारात घेतली जाणार नाही.

नियम करण्याचा अधिकार.

२६. (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेला बाध न आणता अशा नियमांत पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींसंबंधी तरतूद करता येईल :—

[३][* * *]

(ब) मालमत्ता कर बसविला जात नसेल अशा नगरपालिकेच्या क्षेत्रात कर गोळा करण्याची पद्धती आणि कलम ९ अन्वये वटाव देण्याचे दर;

(क) ज्या पद्धतीने व ज्या शर्तीस अधीन राहून, कराची रक्कम कलम १६ अन्वये माफ केली जाईल किंवा परत दिली जाईल ती पद्धत व त्या शर्ती;

(ड) विहित करण्यात येईल असा इतर तपशील व कलम २० अन्वये विशेष आकारणीची यादी प्रसिद्ध करण्याची, अर्ज करण्याची, वाद निकालात काढण्याची व अपील करण्याची पद्धती;

(ई) कलम २१ अन्वये आकारणीत द्यावयाची माफी;

(फ) राज्य शासनाच्या मते नियमान्वये विहित करणे आवश्यक असतील अशा इतर बाबी.

(३) या कलमान्वये नियम करण्यासंबंधीचा देण्यात आलेला अधिकार हा, त्याच्या वापराचा पहिला प्रसंग वगळून असे नियम पूर्वप्रसिद्धीनंतर करण्यात येतील, या शर्तीस अधीन राहील.

(४) ह्या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनांत किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल; आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमांत कोणताही फेरफार करण्यास, दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करु नये म्हणून संमत होतील व असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचीत करतील तर नियम अशा अधिसूचनेच्या तारखेपासून यथास्थिति, अशा सुधारलेल्या स्वरुपातच अंमलात येतील किंवा अंमलात येणार नाही; तथापि, असे कोणतेही फेरफार किंवा रद्द करणे यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम १७ याच्या अनुसूचीद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम १७, याच्या अनुसूचीद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम ५, कलम ८ द्वारे 'खंड अ' वगळण्यात आले.

## [१][अनुसूची अ]

[कलम ४ (अ) पहा]

| वार्षिक भाडेमूल्याचा टप्पा | निवासी प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा उद्देश असलेल्या जमिनींच्या किंवा इमारतींच्या बाबतीत | निवासेतर प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा उद्देश असलेल्या जमिनींच्या किंवा इमारतींच्या बाबतीत |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| **एक.** एखाद्या जमिनीचे किंवा इमारतीचे वार्षिक भाडेमूल्य पुढीलप्रमाणे असेल त्या बाबतीत— | | |
| (एक) ७५ रुपये किंवा त्याहून अधिक परंतु १५० रुपयांपेक्षा अधिक नाही. | वार्षिक भाडेमूल्याच्या २ टक्के | वार्षिक भाडेमूल्याच्या ४टक्के |
| (दोन) रुपये १५० पेक्षा अधिक परंतु रुपये ३०० पेक्षा कमी. | वार्षिक भाडेमूल्याच्या ३ टक्के | वार्षिक भाडेमूल्याच्या ६ टक्के |
| (तीन) रुपये ३०० किंवा त्याहून अधिक परंतु रुपये ३,००० पेक्षा कमी. | वार्षिक भाडेमूल्याच्या ४ टक्के | वार्षिक भाडेमूल्याच्या ८ टक्के |
| (चार) रुपये ३,००० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु रुपये ६,००० पेक्षा कमी. | वार्षिक भाडेमूल्याच्या ५ टक्के | वार्षिक भाडेमूल्याच्या १० टक्के |
| (पाच) रुपये ६,००० किंवा त्याहून अधिक. | वार्षिक भाडेमूल्याच्या ६ टक्के | वार्षिक भाडेमूल्याच्या १२ टक्के |

[२][**स्पष्टीकरण १.**—निवासेतर प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा उद्देश असलेल्या जमिनी किंवा इमारती म्हणजे, कोणताही व्यापार, वाणिज्य, उद्योग, व्यवसाय किंवा धंदा या प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या जमिनी किंवा इमारती आणि निवासी प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा उद्देश असलेल्या जमिनी किंवा इमारती म्हणजे, निवासी प्रयोजनाकरिता किंवा कोणताही व्यापार, वाणिज्य, उद्योग, व्यवसाय किंवा धंदा यांखेरीज कोणत्याही प्रयोजनाकरिता, वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा उद्देश असलेल्या जमिनी किंवा इमारती.]

[३][**स्पष्टीकरण २.**—कोणतीही जमीन किंवा इमारत, अंशतः निवासी आणि अंशतः निवासेतर प्रयोजनासाठी वापरण्यात येत असेल त्याबाबतीत अनुसूची 'अ' मध्ये विहित केलेल्या कराचा दर ठरविण्याच्या प्रयोजनासाठी, संपूर्ण जमिनीचे किंवा इमारतींचे वार्षिक भाडेमूल्य विचारात घेतले जाईल; परंतु पूर्वोक्त दराने कराच्या प्रत्यक्ष रकमेच्या मोजणीसाठी फक्त निवासी किंवा, यथास्थिति, निवासेतर प्रयोजनासाठी वापरल्या जाणाऱ्या किंवा वापरण्याचा हेतू असलेल्या जमिनींच्या किंवा इमारतींच्या भागाचे वार्षिक भाडेमूल्यच विचारात घेतले जाईल.]

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम, १७, कलम १० द्वारे मूळ अनुसूचीऐवजी ही अनुसूची दाखल करण्यात आली.
[२] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम, ५३, कलम ४ द्वारे मूळ स्पष्टीकरणाऐवजी हे स्पष्टीकरण दाखल करण्यात आले.
[३] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम, १७ याच्या अनुसूचीद्वारे मूळ स्पष्टीकरणाऐवजी हे स्पष्टीकरण दाखल करण्यात आले.

**दोन.** कोणत्याही जमिनीचा किंवा इमारतीचा वापर निवासी किंवा निवासेतर प्रयोजनासाठी केला जात आहे किंवा तसा वापर करण्याचा उद्देश आहे किंवा कसे याबद्दल कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास तो प्रश्न निर्णयासाठी जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवण्यात येईल. जिल्हाधिकारी संक्षिप्तरित्या चौकशी करून, आपला निर्णय नमूद करील.

राज्य शासनास **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, संपूर्ण राज्यासाठी किंवा त्याच्या कोणत्याही भागासाठी, विनिर्दिष्ट करील अशा प्राधिकाऱ्याकडे अशा निर्णयाविरूद्धचे अपील करता येईल आणि असे अपील हे जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयाच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत केले पाहिजे.

पूर्वोक्ताप्रमाणे विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिकाऱ्याकडे करावयाच्या कोणत्याही अपीलास अधीन राहून जिल्हाधिकाऱ्याने नमूद केलेला निर्णय व अशारीतीने विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचा अपिलातील निर्णय अंतिम असतील.

[1][**अनुसूची ब**]

[कलमे २ (फ) आणि ४ (ब) पहा]

| | ज्या जमिनीवर पुढील व्यापारी पिके काढण्यात येतात अशी शेतजमीन (१) | विशेष आकारणीचा प्रत्येक हेक्टरी दर (२) |
|---|---|---|
| | | रूपये |
| १. | बारमाही ओलिताच्या जमिनीवर लागवड केलेला ऊस .. .. | १९० |
| २. | इतर कोणत्याही जमिनीवर लागवड केलेला ऊस .. .. | ११० |
| ३. | ओलिताखालील कापूस (संकरित कापूस बियाण्याव्यतिरिक्त) .. | ४० |
| ४. | संकरित कापूस बियाणे .. .. | ११० |
| ५. | संकरित ज्वारीचे बियाणे .. .. | ४० |
| ६. | संकरित मक्याचे बियाणे .. .. | ४० |
| ७. | संकरित बाजरीचे बियाणे .. .. | ४० |
| ८. | ओलिताखालील भुईमूग .. .. | ४० |
| ९. | विड्याची पाने .. .. | १९० |
| १०. | लिंबूवर्गीय फळे .. .. | ८० |
| ११. | केळी .. .. | ११० |
| १२. | द्राक्षे .. .. | ३८० |
| १३. | चिकू .. .. | ८० |
| १४. | हळद .. .. | ८० |
| [2][* * * *] | | |
| १६. | तंबाखू (ओलिताखालील) .. .. | १३० |

[1] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम, ५३, कलम ५ द्वारे मूळ अनुसूचीऐवजी अनुसूची (ब) ही दाखल करण्यात आली.
[2] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम ४५, कलम २ द्वारे नोंद क्रमांक १५ वगळण्यात आली.

**स्पष्टीकरण**.—नोंद १ च्या प्रयोजनासाठी, बारमाही ओलीताची जमीन म्हणजे—

(एक) पाणीपुरवठ्याच्या कोणत्याही साधनापासूनच्या प्रवाहामुळे होणारी म्हणजेच गुरुत्वाकर्षण क्रियेमुळे वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाद्वारे ओली होणारी; किंवा

(दोन) राज्य शासनाने किंवा कोणत्याही जिल्हा परिषदेने बांधलेल्या किंवा सुस्थितीत ठेवलेल्या कोणत्याही साधनापासून किंवा पाण्याच्या इतर कोणत्याही नैसर्गिक साधनापासून शासनाच्या मालकीच्या किंवा त्याने चालवलेल्या उपसापद्धतीद्वारे (लिफ्टद्वारे) अथवा शासनाच्या मालकीच्या किंवा त्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही महामंडळाच्या मालकीच्या व त्याने चालवलेल्या उपसा पद्धतीद्वारे, बारमाही ओलिताखालील कोणतीही जमीन.

## [१][अनुसूची क]

[कलम ६-ब (अ) पहा]

| वार्षिक भाडेमूल्याचा टप्पा | | कराचा दर |
|---|---|---|
| (१) | | (२) |
| एखाद्या जमिनीचे किंवा इमारतीचे वार्षिक भाडेमूल्य— | | |
| (एक) | रुपये ७५ किंवा अधिक परंतु रुपये १५० पेक्षा अधिक नसेल तेव्हा, | वार्षिक भाडेमूल्याच्या १ टक्का |
| (दोन) | रुपये १५० पेक्षा अधिक परंतु रुपये ३०० पेक्षा कमी असेल तेव्हा, | वार्षिक भाडेमूल्याच्या १.५ टक्के |
| (तीन) | रुपये ३०० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु रुपये ३,००० पेक्षा कमी असेल तेव्हा, | वार्षिक भाडेमूल्याच्या २ टक्के |
| (चार) | रुपये ३,००० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु रुपये ६,००० पेक्षा कमी असेल तेव्हा, | वार्षिक भाडेमूल्याच्या २.५ टक्के |
| (पाच) | रुपये ६,००० किंवा त्यापेक्षा अधिक असेल तेव्हा. | वार्षिक भाडेमूल्याच्या ३ टक्के. |

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम, १७, याच्या अनुसूचीद्वारे ही अनुसूची दाखल करण्यात आली.